मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# स्थायी समितीसाठी नगरसेवकांची मोठी चढाओढ

## 20 फेब्रुवारीला 16 सदस्यांची निवड; अध्यक्षपदासाठी भाजपातील दिग्गजांत स्पर्धा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत सलग दुसऱ्यांदा भाजपाची सत्ता आली आहे. एकूण 128 नगरसेवक संख्या असलेल्या महापालिकेत बहुतांश नगरसेवक स्थायी समिती सदस्य पदासाठी इच्छुक आहेत. तर, अनुभवी व दिग्गज नगरसेवक समिती अध्यक्षपदासाठी आग्रही आहेत. त्यामुळे कोणाला संधी मिळते, याची उत्सुकता वाढली आहे. समितीच्या 16 सदस्यांची निवड 20 फेब्रुवारीच्या सर्वसाधारण सभेत होणार आहे.

महापालिकेचे महापौरपदी रवी लांडगे, उपमहापौरपदी शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेतेपदी प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची निवड शुक्रवारच्या (दि. 6) विशेष सभेत झाली आहे. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली वाहून ती सभा 20 फेब्रुवारी दुपारी एकपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. त्या सभेत स्थायी समिती सदस्यांची निवड केली जाणार आहे. त्यात सत्तारूढ पक्षनेते शितोळे, विरोधी पक्षनेते भोईर आणि शिवसेनेचे गटनेते विश्वजित बारणे हे समितीच्या सदस्यासाठी आपल्या पक्षांच्या नगरसेवकांच्या नावाची यादी महापौरांकडे सादर करतील. त्यानंतर काही दिवसात स्थायी समिती सभेत अध्यक्षपदाची निवड केली जाईल. ती निवड विभागीय आयुक्त कार्यालयाने नेमलेल्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

नगरसेवक संख्येनुसार स्थायी समितीमध्ये सत्ताधारी भाजपाचे 11, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार) 4 आणि शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) 1 सदस्य असणार आहे. साहजिकच समितीचा अध्यक्ष भाजपाचा असणार आहे.




### ...तर स्थायी समिती अध्यक्षांकडे आयुक्त सादर करतील अर्थसंकल्प

» स्थायी समितीचे गठण होऊन, समिती अध्यक्षांची निवड झाल्यास महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर अध्यक्षांकडे महापालिकेचा सन 2027-28 चा अर्थसंकल्प सादर करतील. 28 फेब्रुवारीपर्यंत स्थायी समितीच्या अध्यक्षांची नेमणूक करणे गरजेचे आहे. 20 फेब्रुवारीला स्थायी समितीच्या सदस्यांची निवड झाल्यानंतर लगेच सोमवार (दि. 23) ते ते गुरुवार (दि. 26) या कालवधीत अध्यक्षांची निवड होईल. शुक्रवार (दि. 27) किंवा शनिवार (दि. 28) आयुक्तांकडून अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर सादर केला जाईल.

### नाराजांची विषय समितीवर वर्णी

» स्थायी समिती अध्यक्ष तसेच, सदस्यपद न मिळाल्याने पक्षात विशेषत: सत्तारूढ भाजपात नाराजी वाढणार आहे. नाराजी दूर करण्यासाठी पक्षनेत्यांना कसरत करावी लागणार आहे. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला जाईल. नाराज नगरसेवकांची वर्णी शिक्षण, क्रीडा, विधी, शहर सुधारणा, महिला व बालकल्याण या विषय समिती सभापती व सदस्यपदी केली जाऊ शकते. त्या दृष्टीने पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभेतील नगरसेवकांची नावे काढली जात आहेत. कोणाला कोणती समिती द्यायची, याचे आराखडे तयार केले जात आहेत. गटातून विषय समितीचेही वाटप केले जाते.

### अध्यक्षांची निवड

» महापौरांनी शुक्रवारची (दि. 6) विशेष सभा 20 फेब्रुवारी दुपारी एकपर्यंत तहकूब केली आहे. त्या सभेत स्थायी समितीच्या 16 सदस्यांची निवड केली जाऊ शकते. त्यानंतर पुणे विभागीय आयुक्तांची वेळ घेऊन, निश्चित केलेल्या दिवशी तिसऱ्या मजल्यावरील मधुकरराव पवळे सभागृहात 16 सदस्यांमधून एकाची अध्यक्षपदी निवड केली जाईल. त्यानंतर दर मंगळवारी स्थायी समितीची साप्ताहिक सभा होईल, असे महापालिकेचे नगर सचिव मुकेश कोळप यांनी सांगितले.

# दहावी-बारावी परीक्षांसाठी कडक कॉपीमुक्त अभियान; पिंपरी-चिंचवड पोलिसांचा विशेष बंदोबस्त

## राज्यभरात बारावीची परीक्षा 20 फेब्रुवारी 2026 पासून तर दहावीची परीक्षा 10 फेब्रुवारी 2026 पासून सुरु


**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे (राज्य मंडळ) यांच्या निर्देशानुसार दहावी व बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या वतीने परीक्षाकेंद्रांवर कडक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये यासाठी पोलिस प्रशासन सतर्क आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील दहावीचे ७१ तर बारावीचे ४२ परीक्षा केंद्रांवर विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे.

परीक्षा केंद्रांच्या परिसरात १०० मीटरच्या आत अनधिकृत व्यक्तींचा वावर, खाजगी शिकवणी वर्ग, सायबर कॅफे, झेरॉक्स सेंटर, फॅक्स सेंटर, पी.सी.ओ. तसेच ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच मोबाईल, ब्लूटूथ उपकरणे, इंटरनेट साधने किंवा तत्सम इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यावर कडक बंदी घालण्यात आली आहे.

परीक्षेदरम्यान भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कलम १६३ अन्वये आदेश लागू राहणार असून, आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून आवश्यकतेनुसार व्हिडिओ चित्रीकरणही केले जाणार आहे. विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्यासाठी मदत करणे, कॉपी पुरवणे किंवा परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करताना आढळल्यास संबंधितांवर अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# पालिकेच्या शाळांमध्ये हायटीच शिक्षणाचा नवा अध्याय

## पीएमश्री योजनेत दोन शाळांची निवड, म्हेत्रेवाडी शाळेत हायटीच लॅब कार्यान्वित, पिंपळे गुरव येथे अंतिम टप्प्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दोन शाळांची पीएम स्कूल फॉर रायजिंग इंडिया (पीएमश्री) योजनेअंतर्गत निवड झाली आहे. यातील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले म्हेत्रेवाडी शाळा क्र. 92 याठिकाणी पहिल्या हायटीच लॅबचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे शाळेतील मुलांना खासगी शाळांमधील मुलांप्रमाणे हायटीच लॅबद्वारे अभ्यासक्रमाचे धडे मिळणार आहेत, तर पिंपळे गुरव याठिकाणी या लॅबचे काम सुरु आहे. लवकरच पालिकेच्या दोन शाळा हायटीच लॅब शाळा म्हणून ओळखल्या जाणार आहेत. खासगी शाळांच्या दर्जाप्रमाणे या शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला अद्ययावत तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे.



### शाळेमध्ये रोबोटिक्स, ॲस्ट्रॉनॉमी लॅब

» शाळांमध्ये हायटीच लॅब येण्यापूर्वी रोबोटिक्स आणि स्ट्रानॉमी लॅब देखील सुरू करण्यात आल्या आहेत. यामध्ये उत्तम दर्जाच्या दुर्बिणी देखील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध आहेत. ज्यामध्ये विद्यार्थी अवकाश निरीक्षण करू शकतात. अवकाशात घडणाऱ्या खगोलीय घटनांचा अभ्यास करू शकतात. रोबोटिक्स लॅबमध्ये विविध प्रकारचे प्रकल्प विद्यार्थी तयार करतात.

या लॅबमध्ये एक टीचर डेस्क आणि 24 स्टुडंट डेस्क आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यासमोर डिजिटल स्क्रिन, हेडफोन, स्टायलस पेन, साऊंड सिस्टिम या सुविधा देण्यात आल्या आहेत. ई-पोडियम, गेट साफ्टवेअर या ॲप्लिकेशनच्या मदतीने मुलेही त्यांचा डेस्कवरील स्क्रीनचा वापर करून अभ्यासक्रमाच्या ॲक्टिव्हिटी करू शकतात.

शिक्षक याठिकाणी त्यांच्या डेस्कवर त्यांचे अकाऊंट तयार करून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्टिव्हीटीज शिकवितात. यामध्ये स्क्रिन रेकॉर्डिंग, स्क्रिन शॉट, ड्रॉईंग टुल्स आदींचा समावेश आहे. याद्वारे विद्यार्थी चित्र काढणे, वाद्य वाजविणे देखील शिकू शकतात. मात्र, या सर्वांवर शिक्षक त्यांच्या इंटर ॲक्टीव्ह बोर्डद्वारे मुलांच्या कृतीवर नियंत्रण ठेवू शकतात.

या नावीन्यपूर्ण लॅबमध्ये इयत्ता 1 लीपासून ते इयत्ता 8 वीपर्यंत संपूर्ण अभ्यासक्रम ॲनिमेशन स्वरूपात तसेच प्रत्येक घटकावरील सराव प्रनोत्तरे व परीक्षा अशा स्वरूपात आहे. त्यामुळे अवघड घटक तसेच गणित, विज्ञानाच्या क्लिष्ट संकल्पना मुलांना सोप्या पद्धतीने समजावता येतात. यामध्ये खूप सारे प्रोग्राम मुलांच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्त्वविकासासाठी आहेत. मुलांमधील कलागुणांना वाव देणारे अनेक प्रोग्राम यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. गट संवाद, व्हर्च्युअल सभा देखील शिक्षक घेऊ शकतात.

### काय आहे पीएमश्री योजना

» पीएमश्री योजनेसाठीचे निकष पूर्ण करणाऱ्या शाळां या योजनेसाठी पात्र ठरल्या आहेत. येत्या काळात या शाळांचा आदर्श शाळा म्हणून विकास केला जाणार आहे. त्यानुसार प्रत्येक शाळेला पाच वर्षांसाठी 1 कोटी 88 लाख रुपये मिळणार आहेत. ही योजना पाच वर्षासाठी राबविली जाणार असून याअंतर्गत निवड झालेल्या शाळांचे आदर्श शाळेत रूपांतर होणार आहे. या योजनेत निवड झालेल्या शाळांसाठी 60 टक्के निधी केंद्र सरकारकडून मिळणार असून राज्य सरकारचा 40 टक्के हिस्सा असणार आहे.

> पीएमश्री श्रेणीमध्ये पालिकेच्या दोन शाळांची निवड झाली आहे. म्हेत्रेवाडी शाळेत लॅबचे काम पूर्ण झाले आहे, तर पिंपळे गुरव याठिकाणी शेवटच्या टप्प्यात आले आहे. आर्थिक दुर्बल घटकातील मुलांना हायटीच शिक्षण मिळत आहे.
>
> **- संगीता बांगर, प्रशासन अधिकारी, पिं.चिं.मनपा**

> हायटीच लॅबमध्ये अभ्यासक्रम मुलांना कशाप्रकारे शिकवायचा याचे नियोजन आहे. पुस्तकाचा वापर न करता थेट डेस्कवर त्यांना सर्व गोष्टी हाताळता येणार आहेत. याचा वापर आता शिक्षक व विद्यार्थी करायला लागले आहेत. याचा आमच्या मुलांना खूप फायदा होणार आहे.
>
> **- स्नेहल मोरे, मुख्याध्यापिका, म्हेत्रेवाडी मनपा शाळा**

# पीएमआरडीएचा विकास आराखडा रखडला; स्ट्रक्चरल प्लॅनअभावी विकास ठप्प

## अधिकाऱ्यांच्या नियुक्तीअभावी काम थांबले, निवडणूक आचारसंहितेने विलंबात भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा विकास आराखडा रद्द झाल्यानंतर झालेला गोंधळ अद्याप दूर होईना. प्राधिकरणातील समाविष्ट तालुक्यांचा, गावांतील कामांच्या अनुषंगाने या हद्दीचा आरखाडा तयार करा, अशा सूचना राज्य शासनाने पीएमआरडीए दिले होते. त्याच धर्तीवर स्ट्रकचरल प्लॅनच्या आधारे कामे करावीत, असे सांगून मुख्यमंत्री तथा पीएमआरडीएचे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांनी निर्देश दिले होते. पण, आधी नगररचना विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती त्यानंतर निवडणुका आणि त्यावरील प्लानचे कामच नसल्याने प्लानचे काम रखडले आहे.




या प्रकल्पाला पीएमआरडीएकडून वेळ मिळत नसल्याने ते लांबणीवर पडले असून, आता त्यावर पुढील दोन महिने काम सुरु होऊ शकत नाही. त्यामुळे पीएमआरडीएच्या हद्दीत रस्त्यांची जाळे, प्रकल्प, उड्डाणपूल अथवा पायाभूत सुविधा उभारण्यास विलंब होत आहे. पीएमआरडीएने सात हजार चौरस किलोमीटरचा विकास आरखडा तयार केला होता. त्यावर वादंग निर्माण झाल्याने तसेच, त्यावर हरकती आल्याने अखेर राज्य शासनाने तो रद्द केला. मात्र, हा निर्णय घेताना यापुढील काळात विकास आराखडा तयार करण्यापूर्वी स्क्ट्रकचल प्लान तयार करावा, अशा निर्णय घेण्यात आला होता. तसेच, यासाठी एमआरटीपी ॲक्टमध्ये शासनाकडून बदल देखील करण्यात आला होता. त्यानुसार नगर रचना विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी त्यात तरतूद आहे.

आराखडा रद्द झाल्यानंतर स्ट्रकचरल प्लान तयार करण्यासाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी, असा प्रस्ताव प्राधिकरणाने पाठवला. त्यावर अद्याप मान्यता मिळाली नाही. अधिकाऱ्यांची नेमणूक न झाल्याने त्याचे काम थांबले असून, त्यावर अद्याप कोणताचा निर्णय होत नाही. किंबहुना प्राधिकरणाचे अधिकारी देखील त्यावर कोणताही प्रक्रिया करत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे जोपर्यंत हा प्लान तयार होत नाही. तोपर्यंत विकास आराखडा व एकूणच 9 तालुक्यांतील कामे देखील काही प्रमाणात लांबणीवर पडणार आहेत. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड शहरालगत असणाऱ्या गावांचा विकास रखडेल.

### आधीच उशीर आता, आचारसंहितेचे कारण

» विकास आरखाडा रद्द झाल्यानंतर प्रत्यक्षात स्ट्रक्चर प्लानवर काम होणे अपेक्षित होते. पण, या ना त्या कारणाने उशिर होत गेला आता. पुन्हा, पुणे, पिंपरी चिंचवड महापालिका आणि आता जिल्हा परिषद निवडणुकांमुळे पुढे ढकलण्यात येत आहे. आता या विषयांवर स्वतंत्र बैठक घेण्याचे नियोनज केले असले तरी, प्रत्यक्षात अंमलबजवणी होणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# महापालिकेत पदाधिकाऱ्यांसाठी 28 आलिशान गाड्यांचा प्रस्ताव

## पुणे शहराच्या महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांसाठी अद्यावत वाहने खरेदी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेतील प्रशासकराज संपुष्टात येऊन सुमारे चार वर्षांनी महापालिकेचे सभागृह पुन्हा एकदा लोकप्रतिनिधींनी गजबजणार आहे. उद्या (सोमवारी) ९ फेब्रुवारीला महापौर, उपमहापौर पदासाठी निवडणूक घेतली जाणार आहे. यासाठी विशेष सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली असून महापालिकेचे सभागृह अस्तित्वात येणार आहे.

महापालिकेत महापौर उपमहापौर यांच्या निवडीनंतर पुढील काही दिवसातच स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, सभागृह नेते तसेच विविध समित्यांच्या सदस्यांची निवड केली जाणार आहे. या समित्यांच्या सदस्यांमधून अध्यक्षांची निवड होणार आहे. महापालिकेच्या सभागृहात नवीन पदाधिकारी येणार असल्याने त्यांच्या स्वागताची जोरदार तयारी महापालिका प्रशासनाने सुरू केली आहे.

चार वर्षानंतर पुणे शहराला महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकारी मिळणार आहेत. त्यांच्यासाठी अद्यावत वाहने खरेदी करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने घेतला असून यासाठी सव्वा पाच कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. शहराच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौरांसाठी 'हायक्रॉस', विरोधी पक्ष नेता व शहर सुधारणा समिती अध्यक्षांना फिरण्यासाठी 'व्हिक्टोरिअस' या गाड्या दिल्या जाणार आहेत. या गाड्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त आणि आलिशान असून त्यामधून ये जा करतांना पुणेकरांचे लक्ष आकर्षित करून घेणार आहेत.





### पंधरा दिवसांमध्ये सर्व गाड्या महापालिकेच्या ताब्यात

» महापालिकेतील प्रमुख पदाधिकाऱ्यांसह विधी, शिक्षण तसेच इतर समिती अध्यक्षांनाही तितक्याच महागड्या गाड्या मिळणार आहेत. महापालिकेकडून अशा २८ गाड्यांची खरेदी केली जाणार असून यासाठी सुमारे सव्वा पाच कोटी रुपये खर्च होणार आहे. याबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी स्थायी समितीकडे पाठविण्यात आला असून त्याला मंजुरी दिल्यानंतर ही खरेदी केली जाणार आहे. पुढील पंधरा दिवसांमध्ये या सर्व गाड्या महापालिकेच्या ताब्यात दाखल होणारा असून संबंधित पदाधिकाऱ्यांना दिल्या जाणार आहेत.

महापालिकेत यापूर्वी २०१७ मध्ये निवडणूक झाली होती. त्यानंतर २०२२ मध्ये निवडणूक होणार होती. मात्र राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेतल्याने महापालिकेच्या सभागृहाची मुदत संपुष्टात आली. त्यानंतर महापालिकेत राज्य सरकारच्या वतीने प्रशासक नेमण्यात आला. महापालिका आयुक्तांकडेच प्रशासकाची जबाबदारी देण्यात आली. त्यांच्या माध्यमातून गेल्या चार वर्षापासून महापालिकेचा कारभार चालविला जात आहे.

नऊ वर्षापूर्वी २०१७ मध्ये जे पदाधिकारी वाहने वापरत होते. ती सर्व वाहने आता जुनी झाली आहेत. ही वाहने आता वापरता येणार नसल्याने पदाधिकाऱ्यांसाठी ही नवीन वाहने खरेदी केली जात आहेत. त्यासाठी महापालिकेच्या २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे नवीन वाहनांसाठीचा ५ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च महापालिका विकासकामांच्या निधीला काही प्रमाणात कात्री लावून भागविणार का ? अशी विचारणा केली जात आहे.

### अशा आहेत गाड्या...

» शहराचे प्रथम नागरिक म्हणून काम पाहणारे महापौर यांना 'एसयूव्ही' प्रकारातील वाहन दिले जाणार आहे. यासाठी 'इनोव्हा हायक्रॉस' या आलिशान वाहनाची निवड करण्यात आली आहे. त्यासाठी महापालिकेकडून २५ लाख ४१ हजार १५७ रुपये इतके रुपये खर्च केले जाणार आहेत. तर विरोधी पक्ष नेता, शहर सुधारणा समिती अध्यक्ष यांच्यासाठी मध्यम आकारातील 'एसयूव्ही' प्रकारामधील 'मारुती व्हिक्टोरिअस' ही कार खरेदी केली जाणार आहे.

> महापौर, उपमहापौर आणि प्रभाग समित्यांसाठी असलेल्या गाड्या जुन्या झाल्या होत्या. यातील अनेक गाड्या या जुन्या ॲम्बॅसडर प्रकारातील होत्या. त्यांची मुदत संपली होती. महापौर, उपमहापौर यांच्यासाठी सीयाज या गाड्या होत्या. या गाड्याही जुन्या झाल्याने नव्या गाड्या घेण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे.
>
> - रवी पवार, उपायुक्त, महापालिका

---

# धानोरीत महापालिकेची धडक कारवाई; 11,200 चौ.फूट सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त

## भारत माता मार्केट व फिश मार्केट परिसरात जेसीबीची कारवाई, अनधिकृत पत्राशेड जमीनदोस्त

**पुणे | प्रतिनिधी**

धानोरी परिसरातील वाढत्या अतिक्रमणांवर पुणे महापालिकेने जोरदार कारवाई करीत तब्बल 11,200 चौ.फूट सार्वजनिक जागा मोकळी केली. पत्राशेड स्वरूपात उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर जेसीबी चालवत प्रशासनाने भारतमाता मार्केट आणि फिशमार्केटपरिसर अतिक्रमणमुक्त केला. शहरातील सार्वजनिक जागा पुन्हा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली.

अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. सहायक आयुक्त प्रकाश वालगुडे यांच्या नियंत्रणात पथकाने धानोरीतील भारत माता मार्केट परिसरातील सुमारे 5,100 चौ. फूट आणि भारतमाता रोडवरील फिश मार्केट परिसरातील अंदाजे 6,100 चौ.फूट क्षेत्रातील पत्राशेड हटविले. त्यामुळे एकूण 11,200 चौ.फूट जागा पुन्हा सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध झाली आहे.





महापालिका प्रशासनाच्या माहितीनुसार, शहरातील विविध भागांत अनधिकृत स्टॉल, पत्राशेड व बाजारपेठांमधील वाढते अतिक्रमण यामुळे वाहतूककोंडी, अस्वच्छता आणि नागरिकांच्या हालचालींना अडथळे निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर आयुक्त नवलकिशोर राम यांच्या निर्देशानुसार अतिक्रमणविरोधी मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.

उपायुक्त बनकर यांनी सांगितले, की शहर स्वच्छ व शिस्तबद्ध ठेवण्याच्या उद्देशाने अशा कारवाया सातत्याने सुरू राहणार आहेत. वाढत्या अतिक्रमणांमुळे पुणेकरांना त्रास सहन करावा लागत असल्याने प्रशासन कठोर भूमिका घेत आहे.

आगामी काळात आणखी व्यापक आणि निर्णायक कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, ज्यांना अतिक्रमणाबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत, त्यांनी ठराविक मुदतीत स्वतःहून अतिक्रमण हटवावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### सार्वजनिक जागा अतिक्रमणमुक्त

» अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. सहायक आयुक्त प्रकाश वालगुडे यांच्या नियंत्रणात पथकाने धानोरीतील भारत माता मार्केट परिसरातील सुमारे 5,100 चौ. फूट आणि भारतमाता रोडवरील फिश मार्केट परिसरातील अंदाजे 6,100 चौ.फूट क्षेत्रातील पत्राशेड हटविले. त्यामुळे एकूण 11,200 चौ.फूट जागा पुन्हा सार्वजनिक वापरासाठी उपलब्ध झाली आहे.

# द्रुतगती महामार्गावरील कोंडीबाबत प्रशासनाची कबुली

## काही त्रुटी राहिल्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे मान्य; भविष्यात टँकर चालकांचे विशेष प्रशिक्षण व पर्यायी मार्ग

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर अतिसंवेदनशील व अतिज्वलनशील वायूचा टँकर पलटी झाल्याने संपूर्ण महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. याचा फटका वाहनचालक व प्रवाशांना बसला, हे मान्य करत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी प्रशासनाकडून काही प्रमाणात त्रुटी राहिल्याची कबुली दिली. मात्र, अपघातग्रस्त टँकरमध्ये असलेल्या वायूमुळे सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष दक्षता घेणे अपरिहार्य होते, असे त्यांनी सांगितले. या घटनेचा अभ्यास करून भविष्यातील असे प्रसंग टाळण्यासाठी प्रशासन रायगड प्रशासनाच्या मदतीने उपाययोजना करेल असेही त्यांनी सांगितले

शहरात पंधरा दिवसांपूर्वी 'पुणे ग्रँड टूर' ही आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा पार पडली होती. या स्पर्धेसाठी महापालिका हद्दीसह स्पर्धा मार्गावरील रस्ते नव्याने विकसित केले होते. स्पर्धेच्या आंतरराष्ट्रीय निकषांनुसार हे रस्ते तयार केले असून, भविष्यात या रस्त्यांवर पुन्हा खोदाई होऊ नये तसेच याच धर्तीवर इतर रस्त्यांचेही काम व्हावे, यासाठी निर्णय घेण्याच्या उद्देशाने महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी बैठक आयोजित केली होती.

या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्यासह महावितरण, बीएसएनएल आणि पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर महापालिकेत झालेल्या पत्रकार परिषदेत द्रुतगती महामार्गावर झालेल्या वाहतूक कोंडीबाबत जिल्हाधिकारी डुडी यांना प्रश्न विचारण्यात आला.

डुडी यांनी सांगितले की, द्रुतगती महामार्गावर झालेल्या अपघातामुळे नागरिकांना व वाहनचालकांची गैरसोय झाली. अपघातग्रस्त टँकरमध्ये अतिज्वलनशील पदार्थ असल्याने अत्यंत काळजीपूर्वकच टँकर बाजूला करण्याचे काम सुरु होते. या प्रक्रियेदरम्यान अनेक तांत्रिक अडचणी येत होत्या, त्यामुळे वाहतूक कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

भविष्यात अशा प्रकारचे अपघात होऊ नयेत, यासाठी आवश्यक ती खबरदारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जाणार असल्याचे डुडी यांनी स्पष्ट केले. तामिळनाडू, कर्नाटक आदी राज्यांतून येणाऱ्या टँकरच्या चालकांकडून अनेकदा आवश्यक ती काळजी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुढील काळात टँकर चालकांचे विशेष प्रशिक्षण घेतले जाणार असून, टँकर किती वेगाने चालवावा, सुरक्षिततेचे कोणते नियम पाळावेत याची सविस्तर माहिती दिली जाणार आहे.



### पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणार

» पुणे मुंबई द्रुतगती मार्गावर पुन्हा वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार आहेत. टँकर चालकांचे प्रशिक्षण, सुरक्षित वेगमर्यादा यांचा अभ्यास सुरू आहे. भविष्यात अशा घटना घडल्यास वाहन चालकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्यात येतील, असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले आहे.

### यापूर्वीही घडल्या होत्या अशा घटना

» यापूर्वीही द्रुतगती महामार्गावर टँकर पलटी होण्याच्या घटना घडलेल्या आहेत. मात्र, त्या वेळी कमी वेळेत अपघातग्रस्त वाहन बाजूला काढून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात जिल्हा प्रशासनाला यश आले होते. दोन दिवसांपूर्वी लोणावळा परिसरातही असा प्रकार घडला होता. त्या टँकरमध्येही अतिज्वलनशील वायू असल्याने गळती थांबविणे हे जिल्हा प्रशासनासमोर मोठे आव्हान होते.

### टँकर चालकांचे विशेष प्रशिक्षण

» भविष्यात अशा प्रकारचे अपघात होऊ नयेत, यासाठी आवश्यक ती खबरदारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली जाणार असल्याचे डुडी यांनी स्पष्ट केले. तामिळनाडू, कर्नाटक आदी राज्यांतून येणाऱ्या टँकरच्या चालकांकडून अनेकदा आवश्यक ती काळजी घेतली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पुढील काळात टँकर चालकांचे विशेष प्रशिक्षण घेतले जाणार असून, टँकर किती वेगाने चालवावा, सुरक्षिततेचे कोणते नियम पाळावेत याची सविस्तर माहिती दिली जाणार आहे.

# महाशिवरात्रीलाही भीमाशंकर मंदिर भाविकांसाठी बंदच

## सभामंडप उभारणी व परिसर विकास कामांमुळे निर्णय; भाविकांनी सहकार्य करावे – जिल्हाधिकारी

**पुणे | प्रतिनिधी**

भीमाशंकर मंदिराच्या सभामंडपाचे तसेच परिसरातील विकास कामांची कामे सुरू असल्याने महाशिवरात्रीलाही भीमाशंकर मंदिर बंद राहणार आहे.

पुढील वर्षी नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ 2025 मधील अनुभवाच्या आधारे नाशिक कुंभमेळा कालावधीत नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. साधारणत दररोज सुमारे एक लाख भाविक येथे येण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाने बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र भिमाशंकर विकास आराखडा या विशेष विकास आराखड्यास मंजुरी दिलेली आहे.

या विकास आराखड्यांतर्गत भाविकांसाठी सुरक्षित, सुयोग्य व सुसज्ज सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध पायाभूत कामे हाती घेण्यात आलेली असून त्यामध्ये नवीन भव्य सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था, पायरी मार्ग तसेच गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्याची कामे सध्या सुरु असून कुंभमेळ्यापूर्वी सर्व आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

जुन्या सभामंडपाचे क्षेत्र कमी पडणार असल्यामुळे नवीन भव्य सभामंडपाचे काम हाती घेण्यात आलेले असून त्याबरोबरच पायरी मार्गाचे काम देखील सुरू करण्यात आलेले आहे. मुख्य सभामंडप पुर्णत उतरविण्यात आल्यामुळे नवीन सभामंडप तयार करताना श्री भिमाशंकर येथे रोज होणारी गर्दी लक्षात घेता मंदीर दर्शनासाठी बंद केल्याशिवाय ही काम करणे शक्य होणार नव्हते. या कामांच्या अंमलबजावणी दरम्यान बांधकाम साहित्य, मोठ्या आकाराचे दगड व अन्य यंत्रसामग्री मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर ठेवण्यात आलेली आहे.



### भाविकांनी सहकार्य करावे – जिल्हाधिकारी

» पूर्वी भाविकांच्या सोयीचा विचार करून महाशिवरात्री कालावधी (दि. 12 फेब्रुवारी 2026 ते दि. 18 फेब्रुवारी 2026) वगळण्यात आला होता. तथापि, सध्या सुरू असलेल्या बांधकामाच्या कामाचा वेग, व्याप्ती व सुरक्षेच्या बाबींचा सखोल आढावा घेतल्यानंतर, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणात दगडी बांधकाम सुरू असल्याने तसेच दगड व बांधकाम साहित्य हलविणे शक्य नसल्यामुळे, महाशिवरात्री कालावधीत मंदिर दर्शनासाठी खुले ठेवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने शक्य नसल्याचे निदर्शनास आले आहे.